दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४१३ वा ● बुधवार, ता.२४ सप्टेंबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००




## सविता गोस्वामी यांना पीएच.डी. सुमित्रा महाजन यांनाही डी.लिट्. प्रदान

**मुंबई । रयत समाचार**

जीवनात प्रत्येकाला काही टप्पे गाठावे लागतात. काही अपेक्षित, काही गरजेपोटी, तर काही टप्पे असतात असे, जे आपली सहनशीलता आणि अंतः शक्तीची खरी कसोटी पाहतात. अशाच कसोटीवर स्वतःची जिद्द सिद्ध करून टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये कार्यरत सायको-अंकोलॉजिस्ट सविता गोस्वामी यांनी मानसशास्त्रातील पीएच.डी. पदवी प्राप्त केली. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एस.एन.डी.टी.) महिला विद्यापीठ, मुंबईच्या ७५ व्या दीक्षान्त समारंभात नुकताच हा सन्मान त्यांना बहाल करण्यात आला. कॅन्सरग्रस्त बालके आणि त्यांचे सर्वायव्हर या विषयावर संशोधन करून गोस्वामी यांनी ही डॉक्टरेट मिळवली. कौटुंबिक जबाबदाऱ्या, हॉस्पिटलमधील व्यस्त दिनक्रम आणि संशोधनाचा प्रचंड ताण यांचा समतोल साधत हे यश मिळवणे सोपे नव्हते. मात्र जिद्दीने, चिकाटीने आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून त्यांनी हा महत्त्वाचा प्रवास पूर्ण केला. त्यांच्या या यशामुळे टाटा मेमोरियल हॉस्पिटलमधील सहकारी, कॅन्सरग्रस्त मुलांचे पालक आणि समाजमन सर्वांनीच आनंद व्यक्त केला आहे. डॉ. सविता गोस्वामी यांचे हे यश खऱ्या अर्थाने प्रेरणादायी असून, ''जिद्द असेल तर अशक्य काहीच नाही'' याची प्रखर जाणीव करून देणारे ठरले. तसेच लोकसभेच्या माजी अध्यक्षा सुमित्रा महाजन यांना त्यांच्या सार्वजनिक जीवनातील व महिलांच्या सक्षमीकरणातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' (डी.लिट्.) ही मानद पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले, आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी होत असेल तर त्याचे महत्त्व अधिक वाढते. त्यादृष्टीने लोकांचे दैनंदिन जगणे सुसह्य करणारे शिक्षण देणे काळाची गरज आहे. विद्यापीठांनी ज्ञान आणि नवीन संशोधनावर अधिक भर द्यावा.

## ॲमेझॉनच्या अब्जावधी डॉलर गुंतवणुकीने महाराष्ट्राची डिजिटल भविष्याकडे वाटचाल

### थिंक बिग मोबाईल व्हॅन'चे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्र आज देशातील गुंतवणूकदारांचे सर्वात मोठे आकर्षण केंद्र ठरत असून स्वित्झर्लंडमधील दावोस येथील जागतिक अर्थ परिषदेतही सर्वाधिक गुंतवणूक आकर्षित करण्याचा मान महाराष्ट्राने पटकावला आहे. या परिषदेत ॲमेझॉनसोबत करण्यात आलेल्या 'क्लाऊड इन्फ्रास्ट्रक्चर' क्षेत्रातील कराराची अंमलबजावणी झाली आहे.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबई येथे ॲमेझॉन वेब सर्व्हिसेसच्या डेटा सेंटरचे ई-भूमिपूजन पार पडले. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, ॲमेझॉनची ही गुंतवणूक राज्याच्या प्रगतीला नवी दिशा देणार असून कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतूनही शिक्षण, कौशल्यविकास, वीज-पाणीपुरवठा अशा मूलभूत क्षेत्रांत ठोस बदल घडणार आहेत. या पहिल्या टप्प्यात ८.३ बिलियन डॉलरच्या भव्य गुंतवणुकीचा शुभारंभ महाराष्ट्रात होत असून, यामुळे हजारो रोजगार निर्मिती व आधुनिक तंत्रज्ञानाची नवी दारे खुली होणार आहेत.

कार्यक्रमाला मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, ॲमेझॉन वेब सर्व्हिसेसचे जागतिक उपाध्यक्ष मायकल पुंके, दक्षिण आशिया व भारताचे अध्यक्ष संदीप दत्ता, आशिया पॅसिफिक संचालक विक्रम श्रीधरन, भारतातील इन्फ्रास्ट्रक्चर संचालक आदित्य चौधरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी कंपनीने राज्यात सामाजिक उत्तरदायित्व निधीतून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे सादरीकरण केले. विशेष म्हणजे, 'थिंक बिग मोबाईल व्हॅन' या अभिनव उपक्रमाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण झाले. या व्हॅनच्या माध्यमातून मुंबईतील विद्यार्थी आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि नवविचारांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन शिक्षण-प्रेरणा घेणार आहेत. महाराष्ट्राच्या तंत्रज्ञान क्षेत्रातील ही गुंतवणूक फक्त डिजिटल प्रगतीच नव्हे तर सामाजिक आणि शैक्षणिक विकासासाठीही एक मैलाचा दगड ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### या आठवड्याचे मार्मिक मुखपृष्ठ




**या मुख्यमंत्र्यांनी तर आता हद्दच पार केली आहे... राज्यावर ९ लाख कोटींचं कर्ज असताना..राज्याच्या कानाकोपऱ्यात या भाऊंचे पोस्टर लावण्यात आले..ज्याचा खर्च हजारो कोटींमध्ये जातो..हा नक्की कोणाचा पैसा आहे?**

- व्यंगचित्रकार - गौरव सर्जेराव

## आई उदोच्या गजराने दुमदूमला सौंदत्ती यल्लम्मा डोंगर

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**



कर्नाटक, महाराष्ट्र, गोवा तसेच आंध्रप्रदेशातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या सौंदत्ती यल्लम्मा देवस्थानात नवरात्रोत्सवाला उत्साहात प्रारंभ झाला आहे. सोमवार, ता. २२ रोजी झालेल्या घटस्थापनेनंतर आज (मंगळवार) पहाटेपासून श्री यल्लम्मा डोंगरावर भाविकांची मोठी गर्दी वाढू लागली आहे. यासाठी देवस्थान विकास प्राधिकरणाने व्यापक तयारी केली आहे. मंदिर परिसर विद्युत रोषणाईने उजळून निघाला असून देवीची आकर्षक पूजा व अलंकारांनी सजविण्यात आली आहे. सोमवारी देवस्थान विकास प्राधिकरणाचे सचिव अशोक दुडगुंटी यांच्या प्रमुख उपस्थितीत घटस्थापना विधी पार पडले. नवरात्रोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी भाविकांची दर्शनासाठी मोठी रांग लागली असून भाविकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आगामी आठ दिवस चालणाऱ्या उत्सवात लाखो भाविक दाखल होणार असून परिसरात विविध साहित्यांची दुकाने उभारण्यात आली आहेत. १ ऑगस्ट रोजी आयुध पूजेनंतर २ ऑगस्टला सीमोल्लंघन सोहळ्याने नवरात्रोत्सवाची सांगता होणार आहे. उत्सव काळात आरोग्य विभागाचे पथक कार्यरत असून दिव्यांग भक्तांसाठी विशेष वाहनव्यवस्था करण्यात आली आहे.

## छत्रपती शिवरायांच्या अवमान प्रकरणी मुख्यमंत्री गप्प का?




**पिंपरी । रयत समाचार**

अखंड देशाचे प्रेरणास्थान छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचा अवमान करणारी निनावी पोस्टर्स राज्यभर झळकत असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा 'देवाभाऊ' असा उल्लेख करत त्यांची छायाचित्रे मोठ्या प्रमाणात पोस्टर्सवर दिसत आहेत. मात्र, या पोस्टर्स सार्वजनिक शौचालयांच्या भिंतीवर, कचऱ्याच्या कुंड्यांच्या जवळ, गलिच्छ व अस्वच्छ ठिकाणी तसेच रस्त्यालगत लावण्यात आल्यामुळे छत्रपती शिवरायांचा अपमान झालेला आहे. या गंभीर प्रकरणी मुख्यमंत्री महोदय मात्र मुग गिळून गप्प बसले आहेत, असा संतप्त सवाल संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतीश काळे यांनी उपस्थित केला. अधिक माहिती देताना सतीश काळे यांनी सांगितले, सत्ता मिळवण्यासाठी छत्रपतींचा आशीर्वाद घेऊन 'चला देऊ मोदींना साथ' अशी मोहिम छेडली. पण आता त्याच शिवछत्रपतींच्या प्रतिमांना कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ व सार्वजनिक शौचालयांच्या भिंतीवर लावून अपमान केला जात आहे. रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांमुळे चिखल पाणी उडत आहे, अशा ठिकाणी महाराजांचे पोस्टर्स झळकत आहेत. हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा अपमान आहे. या प्रकारामुळे महाराष्ट्रातील जनमानसात तीव्र संताप आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ ऐतिहासिक व्यक्तिमत्व नसून ते महाराष्ट्राची संस्कृती, अभिमान आणि अस्मिता आहेत. त्यांच्याशी संबंधित प्रत्येक गोष्ट ही सन्मानाने केली पाहिजे, ही अपेक्षा आहे. मात्र सध्याच्या प्रकाराने जनतेच्या भावना दुखावल्या असून, सामाजिक आणि राजकीय पातळीवर याविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. दरम्यान, प्रसिद्धीच्या हव्यासापायी छत्रपतींचा असा अपमान का सहन करावा लागत आहे? तसेच जिथे लोक थुंकतात, कचरा टाकतात, तिथेही महाराजांचे पोस्टर लावून त्यांची विटंबना करण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला? हा प्रकार मुद्दाम घडवला गेला आहे का? ''याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपली भूमिका का जाहीर करीत नाहीत? असा सवाल संभाजी ब्रिगेडने उपस्थित करीत या घटनेचा तीव्र निषेध नोंदवला असून, मुख्यमंत्र्यांनी आपली तातडीने भूमिका जाहीर करावी तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी केली आहे. छत्रपतींच्या प्रतिमांचा अवमान सहन केला जाणार नाही. ''येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपला महाराष्ट्रातील शिवप्रेमी जनता धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही असा इशाराही संभाजी ब्रिगेडने दिला आहे.

## बनावट सोनेतारण कर्ज प्रकरणी जिल्हा बँक संचालकांवर गुन्हे दाखल करा

### कर्डिले, म्हस्के, गडाख, राजळे, मुरकुटे, ससाणे, काळे, कोल्हे, घुले यांचा पाय खोलात

**बेलापूर । शफीक बागवान**

अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेत बनावट सोनेतारण कर्ज प्रकरण उघड झाल्यानंतर सहकारक्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणात जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार शिवाजी भानुदास कर्डिले, माजी अध्यक्ष अण्णासाहेब म्हस्के, ज्येष्ठ नेते शंकरराव गडाख, मोनिका राजळे, भानुदास मुरकुटे, करण ससाणे, आशुतोष काळे, विवेक कोल्हे यांच्यासह संचालक मंडळाचा पाय खोलात गेला असून, संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी ठाम मागणी शेतकरी संघटना व फसवणूक झालेल्या खातेदारांकडून करण्यात आली आहे. तक्रारदार व शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी विभागीय सहनिबंधक संभाजी निकम, सहाय्यक विभागीय सहनिबंधक संतोष बिडवई (नाशिक विभाग) यांच्याकडे दिलेल्या निवेदनात बँकेच्या आजी-माजी संचालकांसह श्रीरामपूर शाखेचे अधिकारी रामेश्वर कचरू माळवे व अशोक कचरू माळवे यांनी संगनमत करून खोटे सोनेतारण दाखवत जवळपास दीड ते दोन कोटी रुपयांचे बोगस कर्जरोखे मंजूर करून भ्रष्टाचार केला असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. ७० खातेदारांच्या नावावर बोगस कर्जरोखे २०१९ मध्ये उघडकीस आलेल्या या प्रकरणात नानासाहेब मांढरे, विशाल आदिक, लता गोरे, प्रकाश खैरे, प्रमोद अंबिलवादे, राजू अंबिलवादे, खंडेराव सरोदे, सुनील सरोदे, लक्ष्मण पटारे, ज्ञानेश्वर सोनार, इसाक पटेल, रेश्मा पटेल, कैलास हरे, विश्वास सराफ, प्रदीप करंडे, युनुष शेख, सर्जेराव देवकर, जितेश खैरे, योगेश चिंतामणी, ज्ञानेश्वर नागरे, हेमंत सोळंकी यांच्यासह तब्बल ७० जणांच्या नावे बोगस सोनेतारण कर्जरोखे काढण्यात आल्याचे स्पष्ट झाले. ससाणेंचे आश्वासन फोल या गैरप्रकाराची माहिती तक्रारदारांनी त्यावेळी संचालक करण ससाणे यांना दिली होती. त्यावेळी ससाणे यांनी ''माळवे बंधूंची मालमत्ता विकून पैसे भरून देऊ'' असे आश्वासन दिले होते. मात्र त्यानंतर उलटपक्षी बँकेच्या मुख्य कार्यालयाकडूनच फसवणूक झालेल्या ७० खातेदारांवर वसुलीसाठी दिवाणी दावे दाखल करण्यात आले. सहकार न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार फसवणूक झालेल्या सर्वसामान्य खातेदारांचीच मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पोलिसांकडे अर्ज, पण राजकीय दबाव १८ एप्रिल २०१९ रोजी श्रीरामपूर पोलीस स्टेशनमध्ये संबंधितांवर गुन्हा दाखल करून चौकशीची मागणी करण्यात आली होती. मात्र संचालकांनी राजकीय दबाव टाकून ही तक्रार दडपल्याचा आरोप शेतकरी संघटनेने केला आहे. काही खातेदारांनी तर ''कर्जरोख्यांवरील आमच्या सह्याच खोट्या आहेत'' अशीही तक्रार केली आहे. शेतकरी संघटनेची ठाम मागणी या प्रकरणात जिल्हा बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, शाखाधिकारी तसेच सोनेतारण मूल्यांकन अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून कडक कारवाई करावी, अशी मागणी फसवणूक झालेल्या ७० सभासदांसह शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. सहकार बँकिंगच्या इतिहासातील हा मोठा घोटाळा ठरू शकतो, अशी चर्चा जिल्ह्यासह राज्यभर सुरू झाली आहे.



**बँक प्रशासनाची जबाबदारी मोठी सोनेतारण मूल्यांकन अधिकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या जबाबदारीवर नियुक्त केले जातात. तसेच बँकेत सोने तपासणीसाठी मशीन उपलब्ध असूनही शाखाधिकारी व मूल्यांकन अधिकाऱ्यांनी संगनमत करून खोट्या सोन्याची पडताळणी न करता कर्ज मंजूर केले, असा ठपका ठेवण्यात आला आहे.**

## गोव्यातील दरांमध्ये बदल, व्यापाऱ्यांना अंमलबजावणीसाठी इशारा

**गोवा । रयत समाचार**

गोवा राज्य कर विभागाने व्यापाऱ्यांना नवीन दरांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. विभागाने स्पष्ट केले आहे की, नियमांचे पालन न केल्यास व्यापाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. या निर्णयामुळे ग्राहकांसाठी काही वस्तूंच्या किमतीत कपात होण्याची अपेक्षा आहे. राज्य कर विभागाच्या माहितीनुसार, काही खाद्यपदार्थ, कपडे आणि दैनंदिन उपभोग्य वस्तूंवर दर कमी करण्यात आले आहेत. यामुळे ग्राहकांना या वस्तू स्वस्त दरात उपलब्ध होण्याची शक्यता आहे. तथापि, काही वस्तूंवर कर वाढवण्यात आला आहे, ज्यामुळे त्या वस्तूंच्या किमतींमध्ये थोडी वाढ होऊ शकते. विभागाने व्यापाऱ्यांना निर्देश दिले आहेत की, नवीन दरांची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. निर्देशांचे पालन न केल्यास कायदेशीर कारवाईसह दंडात्मक तरतुदी लागू केल्या जातील. राज्य कर विभागाने व्यापाऱ्यांना सुचवले आहे की, ग्राहकांना नवीन दरांबाबत माहिती देण्यासाठी त्यांच्या दुकानांमध्ये सूचना फलक लावावा आणि बिलिंग प्रणाली अद्ययावत करावी. विभागाने व्यापाऱ्यांना अतिरिक्त मार्गदर्शनासाठी अधिकृत संकेतस्थळाची भेट देण्याची शिफारस केली आहे. याशिवाय, ग्राहकांनी देखील बिल तपासणे गरजेचे आहे, जेणेकरून कोणतीही चुकीची वसुली होणार नाही. विशेषत: नवीन दर लागू झाल्यामुळे ग्राहकांसाठी दैनंदिन जीवनातील आवश्यक वस्तू स्वस्त मिळण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे खरेदीदारांचा खर्च कमी होईल. राज्य कर विभागाच्या या पावल्यामुळे व्यापारी व ग्राहक दोघांनाही नियमांचे पालन सुनिश्चित करणे आवश्यक ठरले आहे.



**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयातील राज्य आपत्कालीन नियंत्रण कक्षाला भेट देऊन राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे उद्भवलेल्या परिस्थितीची माहिती घेतली आणि आवश्यक त्या सूचना दिल्या.**

## बेळगाव मर्चंट्स सोसायटीला १६.६८ लाखांचा निव्वळ नफा, सभासदांना १०% लाभांश

**बेळगाव । प्रतिनिधी**

बेळगाव दि. बेळगाव मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीला सन २०२४२५ या अहवाल वर्षात १६,६८,५३४ रुपयांचा निव्वळ नफा झाला असून सभासदांना १० टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती सोसायटीचे चेअरमन नारायणराव चौगुले यांनी दिली. सोसायटीची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी अनुसुरकर गल्ली येथील श्री दशभुजा गणेश मंदिर छत्रेवाडा सभागृहात पार पडली. सभेच्या अध्यक्ष स्थानावरून चेअरमन नारायणराव चौगुले बोलत होते. यावेळी व्हाईस चेअरमन कुमुद भाटिया, शाखा चेअरमन नारायण किटवाडकर, ज्येष्ठ संचालक ॲड. अशोक बोळगुंडी, अशोक येळ्ळूरकर, महेश रायकर, शिवाजी चव्हाण, नितीन पवार, मिलिंद शिंदे, रेखा अत्तीमरद आणि सोसायटीचे




जनरल मॅनेजर लक्ष्मीकांत मकवान व्यासपीठावर उपस्थित होते. सभेची सुरुवात चेअरमन चौगुले यांच्या हस्ते श्री गणेश पूजन आणि उपस्थित संचालकांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. सभेच्या प्रारंभी दिवंगत सभासद व हितचिंतकांना दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली. जनरल मॅनेजर लक्ष्मीकांत मकवान यांनी मागील वर्षाच्या सभेचा अहवाल, नफा-तोटा अंदाजपत्रक व सोसायटीची आर्थिक स्थिती सभासदांसमोर सादर केली. सभासदांनी सर्व ठरावांना टाळ्यांच्या गजरात मान्यता दिली. शाखा चेअरमन नारायण किटवाडकर यांनी सांगितले की, सोसायटीचे भाग भांडवल ६८,९१,६०० रुपये, ठेवी ३,५०,२३,८०७ रुपये, कर्ज वितरण ३,३४,८२,६९९ रुपये, गुंतवणूक ५,५८,६८,३६८ रुपये, खेळते भांडवल ४,०४,५६,९५० रुपये आणि वार्षिक उलाढाल ९,२१,०७,०७४ रुपये इतकी आहे. सभेत खास दसरा व दिवाळी सणासाठी आकर्षक २१ महिन्यांसाठी मुदत ठेव योजना सुरू असल्याचेही सांगितले गेले आहे. याची मुदत ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत असून सभासदांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन शाखा चेअरमन किटवाडकर यांनी केले. यावेळी संचालक नितीन आप्पासाहेब पवार, प्रणय शेट्टी, ज्येष्ठ सभासद गुरुनाथ पाटील, भास्कर अंकलगी, रवी नाईक, सुनील हुक्केरीकर आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. सभासदांच्या शंका व प्रश्नांचे चेअरमन चौगुले व नारायण किटवाडकर यांनी समर्पक उत्तरे देऊन निरसन केले. सभेला सोसायटीचे सल्लागार, वकील, माजी नगरसेविका, कर्मचारी व पिग्मी कलेक्टर्ससह सभासद बहुसंख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन नारायण किटवाडकर यांनी केले, तर शेवटी संचालक अशोक बोळगुंडी यांनी सर्वांचे आभार मानले.

# ओढे-नाल्यांवरील अतिक्रमण तात्काळ हटवा- पालकमंत्री विखे

## प्रशासनाच्या भूमिकेकडे नागरीकांचे लक्ष



**अहमदनगर । रयत समाचार**

कोल्हार, हनुमंतगाव, पाथरे व पंचक्रोशीतील गावांमध्ये पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीची तातडीने सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, तसेच ओढे-नाल्यांवरील अतिक्रमण कोणालाही पाठीशी न घालता एका महिन्यात हटविण्याचे सक्त निर्देश जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

अतिवृष्टीमुळे भगवतीपूर, पाथरे, हनुमंतगाव परिसरात शेतपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून अतिक्रमणामुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडवला गेल्याने पाणी शेतात घुसल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर नुकसानीची पाहणी आणि उपाययोजना यासाठी लोणी येथे महसूल, कृषी, जलसंपदा, बांधकाम यासह विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीस शिर्डी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, राहाता तहसीलदार अमोल मोरे, कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता श्रीनिवास वर्पे, जलसंपदा विभागाचे स्वप्निल काळे आदी अधिकारी तसेच स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

अतिक्रमणामुळे झालेल्या नुकसानीबाबत महसूल व जलसंपदा विभागाने संयुक्त पाहणी करून तातडीने ओढे-नाले अतिक्रमणमुक्त करावेत, आवश्यक असल्यास मोजणी करून कार्यवाही करावी, कोणतेही अतिक्रमण सहन केले जाणार नाही, असे डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट केले. अनधिकृत प्लॉट विक्रीच्या तक्रारींच्या अनुषंगाने कोल्हार व लोणी खुर्द येथील प्लॉट व्यवहारांची पुन्हा तपासणी करून नियमांनुसार सर्व तरतुदी पूर्ण झाल्या आहेत याची खात्री करण्याचे निर्देश प्रांताधिकारी व तहसीलदारांना देण्यात आले. कृषी विभागाने सरसकट पंचनामे करून ई-पिक पाहणीतील मर्यादाही लक्षात घ्याव्यात. पीकविमा न घेतलेल्या शेतकऱ्यांनाही शासन नियमांनुसार मदत मिळावी, यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले. तसेच वन विभागाने बिबट्यांच्या वाढत्या हालचालींवर नियंत्रण आणण्यासाठी उपाययोजना कराव्यात, पिंजरे उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर करावा, निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाहीही पालकमंत्र्यांनी दिली. पशुसंवर्धन विभागाने लंपी साथीबाबत गांभीर्याने प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी निर्देश दिले.

# जिल्हाधिकारी निवास प्रवेशद्वार चिखलमय

## महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ




**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिकेच्या प्रशासकीय दुर्लक्षामुळे जिल्हाधिकारी निवासाच्या प्रवेशद्वाराची अवस्था अक्षरशः दयनीय झाली आहे. दक्षिण दिशेचे स्टेशनरोडवरील प्रवेशद्वारासमोर खड्डे, चिखल, माती, कचरा व साचलेल्या पाण्याने भरून गेला आहे. परिणामी जिल्ह्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हे निवासस्थानच जणू एखाद्या दुर्गम भागातील रस्त्यासारखे वाटू लागले आहे. नुकत्याच झालेल्या पावसामुळे येथे पाणी साचून चिखल राडारोडा तयार झाला आहे. या ठिकाणी स्वच्छतेचा व जलनिस्सारणाचा कोणताही ठोस उपाय न केल्याने डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत. इतकेच नव्हे तर जिल्ह्याचे प्रमुख अधिकारी असलेल्या कलेक्टर साहेबांनाच आपल्या घरात जाण्यासाठी या राड्यारोड्यातून मार्ग काढावा लागत आहे, ही दुर्दैवी बाब आहे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी व जिल्हाधिकारी निवास परिसरातच जर अशी बिकट परिस्थिती असेल, तर अखंड अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीसह शहराची काय अवस्था झाली असेल याची सहज कल्पना करता येते. तातडीने या समस्येकडे लक्ष देऊन रस्ता दुरुस्तीसह, पाणी काढणी व स्वच्छतेची कामे न झाल्यास नागरिकांचा रोष अधिक वाढण्याची शक्यता आहे. अहिल्यानगर शहरात सध्या सर्वत्र मोठमोठाले कचऱ्याचे उकीरडे झाले आहेत. सर्वत्र डुक्करे, भटके कुत्रे, बेवारस जनावरे यांचा सुळसुळाट झालेला आहे. कोणत्याही शहरात डुक्कर असणे हे अस्वच्छतेचा पहिले लक्षण असते. डिएसपी चौक ते कोठला स्टँड या रस्त्यावर अंदाजे ५०/६० कुत्रे टोळीने फिरताना दिसत आहेत. या रस्त्याने शाळा कॉलेजचे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक पायी जात असतात. या कुत्र्यांचा नागरिकांना मोठा धोका आहे. शहराची दुर्दशा पहाता आमची गौरवशाली अहिल्यानगर महानगरपालिका तातडीने डांगेमुक्त व स्वच्छ करण्याची तातडीची गरज आहे. अकार्यक्षम प्रशासक शहराचे वाटोळे करून टाकू शकतो. अशा कारभारामुळे शहरात साथीचे रोग पसरू शकतात. लोकांच्या आरोग्याशी खेळ चांगला नाही. शहराचे वातावरण चांगले, आरोग्यपुरक असणे ही काळाची गरज आहे.



# छायाताई फिरोदिया यांना जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनचा जीवनगौरव पुरस्कार

**अहमदनगर । रयत समाचार**

समाजकार्यातील उल्लेखनीय कार्य, अखंड जनसेवा आणि संघटनात्मक नेतृत्वाची भक्कम पायाभरणी यांची दखल घेत जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (JITO) च्या वतीने अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. या गौरवामुळे फिरोदिया यांच्या कार्याचा व्यापक सन्मान झाला असून, सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानाची ठळक नोंद समाजजीवनात झाली आहे.

त्यांच्या कार्याचा आदर्श आजच्या पिढीला दिशा देणारा ठरत असल्याचे मत या वेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. पुरस्कार सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. छायाताई फिरोदिया यांचा हा सन्मान समाजातील महिलांच्या नेतृत्वक्षमतेची दखल घेणारा ठरल्याचे सर्वत्र गौरवोद्गार काढले जात आहेत. या सन्मानामुळे समाजकार्य क्षेत्रात नवे प्रेरणास्त्रोत निर्माण झाले आहेत.

# अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या संगनमतामुळे मागासवर्गीय कुटुंब रस्त्यावर

## २६ सप्टेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर तत्कालीन अप्पर उपजिल्हाधिकारी, नगर तालुका तहसीलदार, मंडळाधिकारी, तलाठी तसेच एमआयडीसी पोलीस निरीक्षक यांनी खासगी फायनान्स कंपनीला बेकायदेशीर मदत केली असल्याचा गंभीर आरोप सह्याद्री छावा संघटनेने केला आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, या संगनमतामुळे एका मागासवर्गीय कुटुंबाचे राहते घर जप्त करण्यात आले आहे. संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांविरुद्ध तात्काळ निलंबनाची कारवाई होणे आवश्यक आहे, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे म्हणाले, मागणी मान्य न झाल्यास २६ सप्टेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरु केले जाईल. संघटनेच्या निवेदनात म्हटले आहे की, अप्पर उपजिल्हाधिकाऱ्यांनी अपूर्ण कागदपत्रांच्या आधारे बेकायदेशीर जप्ती केली. फायनान्स कंपनीने आरबीआयच्या नियमांचे उल्लंघन करून कर्ज वसुली केली आणि कर्जदार विजय लोंढे यांना खोटे आश्वासन दिले, परिणामी त्यांना प्रचंड आर्थिक फटका बसला. संघटनेच्या आरोपानुसार, ७/१२ उताऱ्याचा नोंदवहीत मालकी हक्क स्पष्ट नसतानाही तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांनी सरफेसी ॲक्ट २००२ अंतर्गत जप्ती आदेशाची अंमलबजावणी केली. प्रशासनातील काही अधिकाऱ्यांचा थेट सहभाग असल्याचा आरोप असून, संबंधित सर्वांवर गुन्हा दाखल करून कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.



# ग्रामस्थ व सार्वजनिक बांधकाम खात्याच्या संयुक्त प्रयत्नांनी शेतकऱ्यांना दिलासा

**नगर तालुका । रयत समाचार**

तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथे गेल्या आठवड्यात झालेल्या पावसामुळे शेतात साचलेल्या पाण्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. यामुळे गावात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र ग्रामस्थ आणि सार्वजनिक बांधकाम खात्याच्या संयुक्त प्रयत्नांमुळे ही गंभीर समस्या यशस्वीपणे मार्गी लागली असून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या काही दिवसांपासून पिके पाण्यात बुडाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत होता. याची दखल घेत ग्रामपंचायतीने तातडीने पावले उचलली आणि सार्वजनिक बांधकाम खात्याशी संपर्क साधला. सार्वजनिक बांधकाम खात्याचे कनिष्ठ अभियंता विवेक गुंड यांनी मंगळवारी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर ग्रामस्थांच्या सहभागाने खोदकाम, नालेसफाई तसेच पाण्याचा निचरा करण्यासाठी पाईपलाईन व जेसीबीच्या साह्याने साचलेले पाणी काढून टाकण्यात आले. या मोहिमेत पिंपळगाव माळवीच्या सरपंच राधिका प्रभुणे, उपसरपंच मच्छिंद्र झिने, ग्रामविकास अधिकारी दत्तात्रय वाळके, ग्रामपंचायत सदस्य बापू बेरड, मेजर विश्वनाथ गुंड, नानासाहेब झिने, ज्ञानदेव झिने, बाबासाहेब झिने, सिताराम गुंड, गोरख झिने, सोपान गुंड, सुदाम झिने तसेच ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदविला. या यशस्वी उपक्रमामुळे शेतकऱ्यांची चिंता दूर झाली असून, भविष्यात अशा समस्यांवर त्वरित उपाययोजना करण्यासाठी ग्रामपंचायत आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी संयुक्त कार्यपद्धती विकसित करण्याचे ठरवले आहे. स्थानिकांनी या सामूहिक सहकार्याचे कौतुक करत गावातील एकता व प्रशासनाची कार्यक्षमता अधोरेखित केली आहे. पिंपळगाव माळवी ग्रामस्थ व प्रशासनाच्या समन्वयातून उभी राहिलेली ही यशोगाथा ग्रामीण भागातील आदर्श उपक्रम ठरली आहे.

# आरटीओ कार्यालयातील फिटनेस प्रक्रियेत गोंधळ

## नियम धाब्यावर, वाहनमालक त्रस्त- हनुमंत दारकुंडे




**नगर । रयत समाचार**

मोटार वाहन कायदा १९८८ कलम ६२(१) नुसार व्यावसायिक व परिवहन वाहनांना ठराविक मुदतीनंतर फिटनेस प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. मात्र, अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन कार्यालयातील फिटनेस प्रक्रियेत प्रचंड गोंधळ असल्याचे वाहनमालक व लक्झरी बस असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष हनुमंत दारकुंडे यांनी आरोप केला आहे. तक्रारीनुसार, कार्यालयात केवळ एक निरीक्षक असून उर्वरित तपासणी व कागदपत्रांची कामे खाजगी व्यक्तींमार्फत केली जातात. परिणामी वाहनमालकांना मनमानी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. पुणे, औरंगाबादसारख्या कार्यालयांमध्ये फिटनेससाठी स्वतंत्र खिडकी असूनही, अहिल्यानगरमध्ये अशी सोय नसल्यामुळे वाहनमालकांची अडचण वाढली आहे. हनुमंत दारकुंडे यांनी म्हटले की, आवश्यक कागदपत्रे दिल्यानंतरही फिटनेस प्रमाणपत्र एका दिवसात मिळणे अपेक्षित असून, येथे अपॉइंटमेंट स्लिपवर ''स्टार रिमार्क'' मारून अतिरिक्त पैसे वसूल केले जातात.

प्रमाणपत्र ऑनलाइन चार-पाच दिवस उशिरा अपडेट केले जाते, त्यामुळे वाहन उभे राहते व मालकांना आर्थिक तोटा सहन करावा लागतो. त्याचबरोबर, काही वाहनांमध्ये बॉक्स बॉडी, ट्रेलर किंवा ओव्हरहाइट-ओव्हरलेंथसाठी निश्चित वसुली केली जाते; उदाहरणार्थ, बॉक्स बॉडीसाठी ५,००० रुपये, ट्रेलरसाठी १०,००० रुपये आणि ओव्हरहाइट-ओव्हरलेंथसाठी ५,००० रुपये घेतले जातात. वाहन व्यवस्थित असूनही रस्टेड बॉडी दाखवून पैसे उकळले जातात. २०१७ पूर्वी नोंदणी केलेल्या वाहनांचे बॉडी टाईप रेकॉर्ड अद्याप दुरुस्त नसल्यामुळे फिटनेस प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. काही वाहनांमध्ये इनबिल्ट स्पीड गव्हर्नर असूनही अधिकाऱ्यांकडून विसंगती दाखवून नवीन स्पीड गव्हर्नर बसवण्यासाठी ६,००० रुपये मागितले जातात. इतर जिल्ह्यांमध्ये फिटनेस स्वीकारताना १,००० रुपये रोख घेतले जात असल्याची तक्रारही वाहनमालकांकडून समोर आली आहे. याशिवाय, वाहन तपासणी अधिकारी कार्यालयातच ड्रिंक अँड ड्राईव्ह करून तपासणी करतात, अशी गंभीर माहिती मिळाली असून, वरिष्ठ अधिकारी कारवाई करत नसल्याने वाहनमालकांमध्ये संताप निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर दारकुंडे यांनी परिवहन आयुक्तांकडे संबंधित अधिकाऱ्यांवर व खाजगी व्यक्तींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यांनी इशारा दिला की, कोणतीही कारवाई न झाल्यास लक्झरी बस असोसिएशनमार्फत सर्व चालकांचा मोर्चा काढण्यात येईल

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का ?
CASH COUNTER
अधिक माहितीसाठी संपर्क
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# कर्मवीर जयंतीनिमित्त डी.डी.काचोळे विद्यालयाची सवाद्य मिरवणूक

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३८ व्या जयंतीनिमित्त डी. डी. काचोळे माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आयोजित सवाद्य मिरवणुकीने शहरात अभूतपूर्व उत्साह निर्माण केला. मिरवणुकीचा शुभारंभ रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सील सदस्य मीनाताई जगधने व जनरल बॉडी सदस्य प्रकाश निकम पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आला. सुमारे चार किमी लांबीच्या मिरवणुकीत १४३० पेक्षा अधिक विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर वर्ग, पालक व नागरिक सहभागी झाले. मिरवणुकीमध्ये भव्य रथ, बँड पथक, झांज पथक, लेझिम पथक, लाठीकाठी प्रात्यक्षिक आदी आकर्षक ठरले. शहरातील चौकांमध्ये विविध पथकांचे सादरीकरण करण्यात आले. राष्ट्रीय एकात्मतेचे प्रदर्शन दर्शविणाऱ्या मिरवणुकीत राजस्थान, कोळी, शेतकरी, पंजाबी, आदिवासी, दाक्षिणात्य संस्कृती, वारकरी आदी वेशभूषा आणि पारंपरिक कला सादर



## राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन

करण्यात आल्या. नागरिकांनी कर्मवीर अण्णांच्या पुतळ्याचे औक्षण करून आदर व्यक्त केला. प्राचार्य पी.व्ही. बडदे, प्राचार्य डॉ. संजय कांबळे, प्राचार्य डॉ. एम.एस. पोंधे, मुख्याध्यापक सुनील साळवे, मुखाध्यापिका सोनाली पैठणे आदींनी पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले. डी.डी. काचोळे विद्यालयाच्या वतीने सादर केलेले संस्कृतिक कार्यक्रम, लेझिम, लाठी-काठी, झांज पथकाचे सादरीकरण विशेष लक्षवेधी ठरले. मिरवणुकीत राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्म समभाव, संस्कृती व संस्कृतिक वारसा, महापुरुषांचा आदर्श, महाराष्ट्राची लोकधारा, पर्यावरण रक्षण आणि विविध राज्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडवले गेले. याशिवाय एस.के. सोमैय्या प्राथमिक विद्यालय, रा.ब.ना. बोरावके कॉलेज, सी.डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालय व डी.डी. काचोळे विद्यालयांच्या मिरवणुकीचा समारोप कर्मवीर चौकातील पुतळ्याजवळ पार पडला. श्रीरामपूर पोलीस स्टेशनाचे अधिकारी व ट्राफिक पोलीस युनिट यांनी मिरवणुकीचा चोख बंदोबस्त राखला. विद्यार्थ्यांसाठी स्वादिष्ट भोजनाची व्यवस्था करण्यात आली. विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील साळवे, पर्यवेक्षक सूर्यकांत सराटे, स्टाफ, एनसीसी विद्यार्थी, वस्तीगृहातील विद्यार्थी व पालक यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. मिरवणूक कार्यक्रम यशस्वी पार पडला आणि शहरभर उत्साही वातावरण निर्माण झाले.

# अतिवृष्टीग्रस्तांचे तातडीने पंचनामे करून मदत द्या- स्नेहलता कोल्हे

**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगाव मतदारसंघात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले असून अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना घराबाहेर राहावे लागले आहे. निवाऱ्याचे गंभीर संकट निर्माण झाल्याने प्रशासनाने तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत आणि बाधितांना त्वरित मदत पुरवावी, अशी मागणी माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी केली आहे. अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कपाशी, ऊस, मका यांसह विविध पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच घरांमध्ये पाणी शिरल्याने धान्यसाठा, घरगुती साहित्य आणि जनावरांचेही नुकसान झाले आहे. कोल्हे यांनी प्रशासनाला तातडीने मदतकार्य सुरू करण्याचे आवाहन केले आहे. कोल्हे म्हणाल्या की, ''मतदारसंघातील अनेक शेतकऱ्यांचा कष्टाचा घाम पावसाने वाहून गेला आहे. अशा



वेळी प्रशासनाने तत्परतेने पंचनामे करून शेतकऱ्यांना व नागरिकांना योग्य नुकसानभरपाईचा दिलासा द्यावा.'' सध्या काही भागात ओढे, नाले आणि पुलांवरून पाणी वाहत असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. अशा ठिकाणी बाधितांसाठी अन्न, पिण्याचे पाणी आणि आरोग्यसेवा यांची सोय करण्याचे निर्देश प्रशासनाने द्यावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. माजी आमदार कोल्हे यांनी शेतकरी व नागरिकांना धीर देत प्रशासनाशी सतत संपर्कात राहून मदत पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन दिले. ''तातडीने मदतकार्य सुरू करून कोपरगाव मतदारसंघातील जनतेच्या संकटात सहभागी होणे हीच खरी जनप्रतिनिधी म्हणून जबाबदारी आहे,'' असे त्या म्हणाल्या.

# अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करून तात्काळ मदत द्या-धनगर

**नेवासा । विजय खंडागळे**



नेवासा तालुक्यात गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे खरीप पिकांचे तसेच फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. कापूस, सोयाबीन, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी यांसह विविध फळबागांवर अतिवृष्टीचा मोठा परिणाम झाला आहे. शासनाने तातडीने सरसकट पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकरी आणि नागरिकांना त्वरित मदत द्यावी, अशी मागणी भाजपाचे नेवासा तालुका उपाध्यक्ष विशाल धनगर यांनी नायब तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या हंगामात आधीच पावसाचा खंड, अतिवृष्टी, रोगराई आणि किडीचा प्रादुर्भाव यामुळे हजारो एकर क्षेत्र बाधित झाले असताना परतीच्या पावसाने उरलेली पिकेही नष्ट झाली आहेत. अनेक ठिकाणी पूरसदृश परिस्थिती निर्माण होऊन शेतजमिनी खरडून गेल्या आहेत. पाण्याचा निचरा न झाल्याने गावांमध्ये पाणी साचून घरे पाण्यात बुडाली आहेत. काही ठिकाणी घरांवर झाडे पडून घरे उध्वस्त झाली असून गुरांचे गोठे कोसळले आहेत. घरांमधील जीवनावश्यक साहित्य, अन्नधान्य, कपडे आणि इतर वस्तू पाण्यात भिजल्याने नागरिक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. याशिवाय काही बाजारपेठांमध्येही पुराचे पाणी शिरल्याने व्यापाऱ्यांचेही मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर धनगर यांनी सर्व मंडलांतील मंडलाध्यक्ष व तलाठी अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन नुकसानग्रस्तांचे सरसकट पंचनामे तातडीने करावेत आणि बाधितांना शक्य तितक्या लवकर मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.



# बाबूराव बोत्रे पाटील यांना उत्कृष्ट साखर उद्योग गौरव पुरस्कार

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

साखर उद्योग तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीची संस्था दि डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट्स असोसिएशनतर्फे आयोजित ७० वी वार्षिक परिषद आणि शुगर एक्स्पो२०२५ मध्ये ''उत्कृष्ट साखर उद्योग गौरव पुरस्कार'' ओंकार ग्रुपचे सर्वेसर्वा बाबूराव बोत्रेपाटील यांना प्रदान करण्यात आला. हा मानाचा पुरस्कार ओमराजे बाबूराव बोत्रेपाटील यांनी स्वीकारला. पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील आणि कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते सन्मान प्रदान करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, राष्ट्रीय साखर संस्थेच्या संचालक डॉ. सीमा परोहा, साखर आयुक्त सिद्धाराम सालीमठ, वेस्ट इंडिया शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे, एस.टी.आय.ए.चे अध्यक्ष संजय अवस्थी तसेच एस.आय.एस.एस.टी.ए.चे अध्यक्ष एन. चिन्नप्पन उपस्थित होते.

# श्रीगोंद्यात तीन दिवसीय दिव्यांग जोडो अभियान- गोरे

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार श्रीगोंदा नगरपरिषद आणि प्रहार दिव्यांग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने ''दिव्यांनी नोंदणी आणि दिव्यांग जोडो'' या तीन दिवसीय अभियानाचे आयोजन गुरुवार, ता. २५ सप्टेंबर २०२५ ते शनिवार,ता. २७ सप्टेंबर २०२५ दरम्यान करण्यात आले आहे. हे अभियान दररोज सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत श्रीगोंदा नगरपरिषद कार्यालयात पार पडणार असल्याची माहिती भाजप गटनेत्या छायाताई गोरे यांनी दिली.

नगरपरिषद हद्दीतील सर्व दिव्यांग व्यक्तींनी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. नोंदणीसाठी खालील कागदपत्रांची आवश्यकता आहे: दिव्यांग प्रमाणपत्र (ऑनलाइन), यू.डी.आय.डी. कार्ड, आधार कार्ड, पासपोर्ट आकाराचा एक फोटो, बँक पासबुकची झेरॉक्स प्रत, रेशन कार्डची झेरॉक्स प्रत आदी. वरील सर्व आवश्यक कागदपत्रांसह नगरपरिषद कार्यालयात नोंदणी करावी, असे आवाहन गटनेत्या छायाताई गोरे आणि प्रहार दिव्यांग संघटनेचे राजेंद्र पोकळे यांनी संयुक्तपणे केले आहे. या अभियानासाठी नगरपालिका मुख्याधिकारी, सर्व नगरसेवक आणि संस्थेच्या अधिकाऱ्यांनी सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.



# मुलांना मोबाईलपासून दूर ठेवावे- कुंकूलोळ

## पाटणी विद्यालयात पालक-शिक्षक सहविचार सभा

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

शां. ज. पाटणी माध्यमिक विद्यालयात आयोजित पालक मेळाव्यात पालकांनी आपल्या मुलांना मोबाईलपासून दूर ठेवून त्यांच्यासोबत अधिक वेळ घालवावा तसेच त्यांना विविध क्रीडा प्रकार आणि छंद जोपासण्यासाठी मदत करावी, असे पालक शिक्षक सह विचार सभेच्या अध्यक्ष भरत कुंकूलोळ यांनी सांगितले. कार्यक्रमात माजी मुख्याध्यापिका व स्कूल कमिटी सदस्य चित्रा कडू, माजी उपमुख्याध्यापिका मानसी घोलप, माजी मुख्याध्यापक विठ्ठल भांगरे, विद्यालयाचे मुख्याध्यापक चंद्रशेखर वाघ, किरण पुंड, कैलास जेजुरकर आदी मान्यवर उपस्थित होते. सभेच्या अध्यक्ष स्थानावरून दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजन करण्यात आले. यावेळी शिक्षक पालक संघाची स्थापना करण्यात आली. संघाच्या अध्यक्षपदी चंद्रशेखर वाघ, उपाध्यक्षपदी सौ. प्रीती महिंद्र शेटे, सचिवपदी अनुप्रीती पवार व प्रसाद ब्राह्मणे यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमात पालकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसंबंधी आपले मनोगत व्यक्त केले, तर शिक्षकांच्या वतीने नितीन यशवंत आणि अनुप्रीती पवार यांनी मनोगत मांडले. प्रास्ताविक कैलास जेजुरकर यांनी केले तर आभार स्नेहल गाडेकर यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रका कळमकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक प्रयत्नशील होते.

# लिलाबाई भुसारी यांचे निधन

**नेवासा । विजय खंडागळे**



नेवासा तालुक्यातील सोनई येथील जुन्या पिढीतील लिलाबाई नवनाथ भुसारी (वय ७४) यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी रामनाथ भुसारी आणि सुरेश भुसारी यांच्या त्या मातोश्री होत. लिलाबाई भुसारी यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# 'पाटणी'च्या स्वामिनीला नेमबाजीत 'सुवर्ण'

**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**

नेमबाजीच्या थरारात अचूक निशाणा आणि पोलादी संयमाच्या जोरावर श्रीरामपूर येथील शां. ज. पाटणी विद्यालयातील स्वामिनी कैलास जेजुरकर हिने सुवर्णपदक पटकावले आहे. नेवासा फाटा येथील त्रिमूर्ती विद्यालयात पार पडलेल्या जिल्हास्तरीय शूटिंग स्पर्धेत १७ वर्षांखालील गटातील एअर पिस्तोल प्रकारात तिने प्रतिस्पर्धकांना मात देत सुवर्ण पदकाची कमाई केली. या विजयामुळे स्वामिनीची विभागीय स्पर्धे साठी निवड झाली आहे.महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत आयोजित या प्रतिष्ठित स्पर्धेत जिल्ह्याच्या विविध भागांतून नेमबाज सहभागी झाले होते. अत्यंत चुरशीच्या सामन्यात स्वामिनीने सुरुवातीपासूनच आपल्या खेळावर लक्ष केंद्रित ठेवत विजय मिळवला.या यशामागे अहमदनगर शूटिंग क्लबचे प्रशिक्षक ऋषिकेश दरंदले यांचे अचूक मार्गदर्शन, विद्यालयाचे क्रीडाशिक्षक बाबासाहेब औटी व उर्मिला पुजारी यांची मोलाची साथ लाभली. स्वामिनीच्या या देदीप्यमान यशाबद्दल हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी, विद्यालयाचे चेअरमन भरत कुंकलोळ आणि मुख्याध्यापक चंद्रशेखर वाघ यांनी तिचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# शासनाने ठोस व प्रभावी धोरण आखावे- राज्य पत्रकार संघाची मागणी

## पत्रकारांवरील हल्ल्याचा निषेध

**कोपरगाव । किसन पवार**

शनिवार, ता. २० सप्टेंबर २०२५ रोजी त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक येथे वार्तांकनासाठी गेलेल्या झी २४ तासचे ब्युरो चीफ योगेश खरे, साम टीव्हीचे ब्युरो चीफ अभिजित सोनवणे आणि पुढारी न्यूजचे ब्युरो चीफ किरण ताजने यांच्यावर स्वामी समर्थ केंद्राजवळील पार्किंगमध्ये कार्यरत गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी दगडफेक करून आणि लाथाबुक्यांनी भीषण हल्ला केला. या हल्ल्यात किरण ताजने गंभीर जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. ही घटना अत्यंत निंदनीय असून राज्य पत्रकार संघ, कोपरगाव तालुका व शहर शाखेसह तालुक्यातील पत्रकारांनी कोपरगावचे तहसीलदार तसेच शहर व ग्रामीण पोलिस निरीक्षक यांना निवेदन देत कठोर कारवाईची मागणी केली आहे. या प्रसंगी तालुकाध्यक्ष जनार्दन जगताप, शहराध्यक्ष हफीज शेख, उपशहराध्यक्ष स्वप्नील कोपरे, सचिव विजय कापसे, कार्याध्यक्ष बिपीन गायकवाड, संतोष जाधव, सोमनाथ सोनपसारे, विनोद जवरे, सोमनाथ डफळ,



काका खर्डे, रवी जगताप, रवी वाघडकर, विशाल लोंढे, संजय लाड, दिपक जाधव आदी पत्रकार उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, ''पत्रकारांवर वारंवार होणारे हल्ले ही लोकशाहीला काळिमा फासणारी व चौथ्या स्तंभावर घाला घालणारी गंभीर बाब आहे. पत्रकार समाजातील सत्य घटनांचा आवाज बनून अन्याय, भ्रष्टाचार व सामाजिक प्रश्न प्रकाशात आणण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतात. अशा व्यक्तींवर होणारे हल्ले अत्यंत निंदनीय व असह्य आहेत. त्यामुळे सदर प्रकरणातील सर्व हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्यात यावी, राज्यातील पत्रकारांच्या सुरक्षेसाठी शासनामार्फत विशेष उपाययोजना कराव्यात आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शासनाने ठोस व प्रभावी धोरण आखावे,'' अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे.

# बेरोजगारीचे भीषण वास्तव

भारत हा तरुणांचा देश आहे. जगातील सर्वाधिक तरुण भारतात आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ४० टक्के लोकसंख्या ही तरुणांची आहे. आज आपण याच तरुणांच्या जोरावर महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. तरुणांच्या या ऊर्जेचा योग्य वापर झाल्यास भारताला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही असा ठाम विश्वास डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांना होता. डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांच्यासारख्या द्रष्ट्या व्यक्तीने जे ओळखले ते आजच्या राज्यकर्त्यांना मात्र ओळखता आले नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल कारण आजच्या तरुणांच्या ऊर्जेचा, त्यांच्या गुणवत्तेचा उपयोग सरकारला करून घेता येता नाही किंवा सरकार जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करत आहे याचा पुरावाच स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२३ च्या अहवालातून पाहायला मिळतो. या अहवालातून देशातील बेरोजगारीच्या समस्येचे भीषण वास्तव समोर आणले आहे. या अहवालानुसार देशात तरुण पदवीधर बेरोजगाराईचा दर ४२.३ टक्क्यांच्या उच्च स्तरावर आहे, तर कमी शिकलेल्या लोकांच्या बेरोजगारीचा दर ८ टक्के आहे. २५ ते ३० वर्ष वयोगटातील पदवीधर किंवा उच्च पात्रता धारक तरुणांचा बेरोजगरीचा दर २२.८ आहे. उच्च माध्यमिक स्तरावरील पात्रता असलेल्या आणि २५ वर्षापेक्षा कमी वयोगटातील तरुणांमध्ये बेरोजगारीचा दर २१.४ टक्के इतका आहे. याचाच अर्थ कमी शिकलेल्या पासून पदवीधर असलेल्या तरुणांपर्यंत सर्वांनाच बेरोजगारीचा प्रश्न भेडसावत आहे. ही आकडेवारी चिंताजनक आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

देशातील ४० टक्क्यांहून अधिक तरुण जर बेरोजगार असतील तर त्या तरुणांच्या मानसिकता काय असेल याचा विचार न केलेलाच बरा. शिक्षण आहे, पदवी आहे, काम करण्याची उर्मी आहे, कुटुंबासाठी, देशासाठी काही तरी करुन दाखवण्याची इच्छा आहे मात्र नोकरी नाही अशी अवस्था तरुणांची आहे. नोकरी नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड नैराश्य आले आहे. आपण इतके शिकूनही आपल्या शिक्षणाचा उपयोग होत नाही त्यामुळे तरुण प्रचंड अस्वस्थ आहेत. शासन रोज नवे परिपत्रक काढून तरुणांचा रोजगार हिरावून घेत आहे. सध्या तर खाजगीकरणाचे पेव फुटले आहे त्यामुळे सरकारी नोकरी मिळवण्याचे तरुणांचे स्वप्न स्वप्नच राहणार आहे. वास्तविक गेल्या अनेक वर्षांपासून सरकारी नोकर भरती झालेली नाही. नोकर भरतीसाठी सरकार जाहिरात काढते. हजारो रुपये परीक्षा फी घेऊन तरुणांची परीक्षा घेते मात्र प्रत्यक्ष नोकरी काही देत नाही. कधी पेपर फुटीचे तर आणखी काही कारण देऊन भरती पुढे ढकलली जाते. शिक्षक भरती हे त्याचे उत्तम उदाहरण. आज सरकारच्या सर्वच खात्यात कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. एक लिपिक चार चार टेबल सांभाळीत आहे, एक शिक्षक चार चार वर्ग शिकवत आहे, गेली अनेक वर्षे पदोन्नती झालेली नाही जर सरकारने सरकारी नोकऱ्यांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय रद्द करून भरती केली तर देशातील बेरोजगारी काही प्रमाणात का होईना कमी होईल मात्र सरकारला तरुणांच्या रोजगाराचे काहीही देणे घेणे नाही. नोकरी मागायला गेलेल्या तरुणांना राजकीय नेते पकोडे तळा म्हणत त्यांची कुचेष्टा करत आहेत. शिक्षण असून नोकरी नाही, शेती असून शेतात काही पिकत नाही. नोकरी नाही, शेतीही बेभरवशाची झाली आहे, स्वतः चा व्यवसाय करावा म्हटलं तर भांडवल नाही त्यामुळे आजचा तरुण प्रचंड अस्वस्थ आहे. या अस्वस्थतेचा उद्रेक केंव्हाही होऊ शकतो. जर तरुणांच्या अस्वस्थतेचा उद्रेक झाला तर भल्या भल्यांना पळता भुई थोडी होईल म्हणूनच सरकारने तरुणांच्या हाती रोजगार द्यावा. त्यांच्यात असलेल्या ऊर्जेचा राष्ट्रकार्यासाठी उपयोग करून घ्यावा. देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारने ठोस प्रयत्न करावेत.

# विद्या भडके यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षिका पुरस्कार अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाच्या श्री शिवाजी हायस्कूल ता. शेवगाव येथील शिक्षिका विद्या रामभाऊ भडके यांना प्रदान करण्यात आला. मुंबईत झालेल्या राज्यस्तरीय समारंभात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते त्यांना हा सन्मान मिळाला. या प्रसंगी विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, प्रधान शालेय शिक्षण सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह, संचालक महेश पालकर आदी मान्यवर उपस्थित होते. नागरदेवळे, ता. नगर येथील रहिवाशी असलेल्या विद्या भडके या लेखिका व कवयित्री असून, श्री शिवाजी हायस्कूल बोधेगाव येथे अनेक वर्षांपासून अध्यापन करीत आहेत. कवितासंग्रह व कथालेखनाद्वारे सामाजिक प्रश्नांना हात घालणारे त्यांचे साहित्य प्रसिद्ध आहे. अध्यापनासोबतच त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक, कला व क्रीडा क्षेत्रात घडविण्याचे मोलाचे कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी जिल्हा, विभागीय आणि राज्यस्तरावर यशस्वी झाले आहेत. भडके यांच्या कार्याची दखल घेत राज्य शासनाने त्यांना हा सन्मान बहाल केला आहे. त्यांच्या यशाबद्दल जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रामचंद्र दरे, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, श्री शिवाजी हायस्कूलचे मुख्याध्यापक अशोक मोरे, पर्यवेक्षक सुनील साबळे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, तसेच भाऊसाहेब पानमळकर, पोपट बनकर, प्रा. सिताराम जाधव, अनिल धाडगे, ॲड. महेश शिंदे, भाऊसाहेब कासार, आश्विनी विधाते, स्वाती बनकर आदींसह ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले.





# कांगोणी सेवा सोसायटीची सर्वसाधारण सभा उत्साहात

**नेवासा । विजय खंडागळे**

नेवासा तालुक्यातील अग्रगण्य कांगोणी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन सुनील नामदेव रौदळ यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेला जेष्ठ सभासद रंगनाथ रौदळ व बाबासाहेब शिंदे उपस्थित होते. मुळा सहकारी साखर कारखान्याचे संचालक आदिनाथ रौंदळ यांनी चर्चेत सहभाग घेतला. सभेत गोरख साळुंखे यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी सरसकट पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी केली. तसेच जेष्ठ सभासद बाळुकाका सोनवणे यांनी सरकारने कर्जमाफी करावी असा ठराव मांडून त्यासाठी पाठपुरावा करण्याचे सूचित केले. प्रास्ताविक सरपंच सोमनाथ कराळे यांनी केले. सभेसाठी व्हा. चेअरमन ज्ञानदेव शिंदे, माजी चेअरमन व संचालक दुर्योधन सोनवणे, सुभाषराव भालेकर, अशोक कर्डिले, रामभाऊ कराळे, महेश ठोंबळ, रमेश कराळे, कारभारी कोकाटे, मच्छिंद्र कर्डिले, मच्छिंद्र वडागळे, पोपटराव रौंदळ, गोरक्षनाथ ठोंबळ, बाळासाहेब रौंदळ, बाबासाहेब कर्डिले, संतोष ठोंबळ, जगन्नाथ शिंदे, नितीन शिंदे, संतोष उणेचा आदी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे सचिव व्ही. एम. खंडागळे यांनी वार्षिक अहवाल वाचन केले, तर नोटीस वाचन लेखापाल आर. एन. शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शन तज्ञ संचालक बाळासाहेब रौदळ यांनी केले. यावेळी मुळा फॅक्टरी शाखेचे बँक इन्स्पेक्टर वैभव दरंदले व नेवासा स्टाफ सोसायटीचे व्हा. चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल विजय खंडागळे यांचा संस्थेच्या वतीने संचालक पोपटराव रौदळ व बाळुकाका सोनवणे यांनी शाल-श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

# अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांना पिकविमा, नुकसान भरपाई मिळावी- राळेभात

**जामखेड । रिजवान शेख**

जामखेड तालुक्यातील सर्व महसुली गावांमध्ये अतिवृष्टीमुळे अनेक घरांची पडझड झाली आहे. नदी पात्राशेजारील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी वाहून गेल्या असून, शेतातील कांदा, सोयाबीन, उडीद, मुग, तूर, मका, कपाशी, ऊस यांसह फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जिल्हा सहकारी बँकेचे संचालक अमोल जगन्नाथ राळेभात यांनी राज्य शासनाकडे मागणी केली आहे की, सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीला नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित करावे आणि NDRF निकष बाजूला ठेवून अतिरिक्त मदत प्रदान करावी. बाधित क्षेत्राचे सर्वेक्षण करून किमान ३३% पेक्षा जास्त शेतपिकाचे नुकसान झाल्यास मदत देण्यात यावी. तसेच आपतीग्रस्त लोकांना जीवनावश्यक वस्तू आणि वैद्यकीय सुविधा तत्काळ पुरविण्यात याव्यात. राळेभात यांनी सांगितले की, जामखेड तालुक्यातील पूरपरिस्थिती अत्यंत भयानक असल्यामुळे शासनाने २४ तासात ६५ मिमी पेक्षा जास्त पावसाला निकष कायम ठेवून सामान्यकृत वनस्पती निर्देशांक (NDVI) हा अतिरिक्त निकष तत्काळ लागू करून नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या बचत खात्यावर दिवाळीपूर्वी जमा करावी. तसेच खरीप हंगामातील सर्व पिकांचा पिक विमा मंजूर करताना ई-पिक पाहणी निकष शिथिल करून पिक विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम देण्यात यावी. ही मागणी कर्जत-जामखेडचे लोकप्रिय आमदार रोहित पवार, जिल्हाधिकारी आणि जामखेडचे तहसिलदार यांना केली आहे.






# धर्मोत्सवाऐवजी सत्यशोधक होऊन समाजहितासाठी शिक्षणाची वाटचाल- लंके

## रयतचे शिक्षण लोकशाही हिताचे

**राहुरी । रयत समाचार**

तालुक्यातील सात्रळ येथील रयत शिक्षण संस्थेच्या रयत शैक्षणिक संकुल येथे थोर शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३८ व्या जयंती सोहळ्याचा उत्साहात समारोप झाला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून सीएसआरडी बीजेएमसीचे अध्यापक तथा दैनिक लोकमतचे निवासी संपादक सुधीर लंके यांनी प्रेरणादायी विचार मांडले. धर्मोत्सव साजरे करण्यापेक्षा सत्यशोधक बनून समाजहित जपणारे रयतचे शिक्षण हेच खऱ्या अर्थाने लोकशाहीच्या हिताचे आहे. धर्मामुळे मानपान हरवले आणि भेदाभेद वाढले, त्यामुळे विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी, परीश्रमवादी बनले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षस्थानी ज्ञानदेव अनाप, प्रगतशील शेतकरी सात्रळ यांनी भूषविले. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरुण कडू पाटील, ॲड. विजयराव कडू पाटील, संभाजीराव चोरमुंगे पाटील, किरण कडू पाटील, पंकज कडू पाटील, सुखदेव मुसमाडे, नामदेवराव गुंजाळ, भास्करराव फणसे, गणेश कडू पाटील, हिरानंदानी शेठ, किशोर भांड, दिनकराव कडू पाटील, शिरसाठ साहेब, मधुकर अनाप, प्रा. विलास दिघे, विद्या ब्राह्मणे, प्राचार्य सिताराम गारूडकर, पर्यवेक्षिका हेमलता साबळे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. प्रारंभी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेची मिरवणूक ढोल-ताशा, झांज, लेझीम व टिपऱ्यांच्या गजरात काढण्यात आली. लंके म्हणाले, कर्मवीरांनी सुरू केलेली कमवा व शिका योजना माणसाला स्वावलंबी बनवते. अन्याय सहन न करणे हेच कर्मवीरांच्या खऱ्या शिष्याचे लक्षण आहे. इंग्लंडच्या अनुभवातून शिस्त, स्वच्छता व तंत्रज्ञानाचा योग्य वापर आपण शिकायला हवा. प्रास्ताविक प्राचार्य गारूडकर यांनी केले. सूत्रसंचालन पलघडमल व रामदास तांबे यांनी तर आभार विद्या ब्राह्मणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रयत संकुल सात्रळमधील सर्व सेवकबंधू-भगिनींनी परिश्रम घेतले. उपस्थित ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.




# विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षिततेचे मार्गदर्शन

## खालापूर पो.स्टे. दामिनी पथकाचा पुढाकर

**रायगड । सोपान आडसरे**

जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल, वावर्ले येथे विद्यार्थ्यांसाठी सुरक्षितता आणि सायबर क्राइम या विषयावर मार्गदर्शन शिबीर संपन्न झाले.

मंगळवारी ता. २३ सप्टेंबर रोजी आयोजित या शिबिराचे मार्गदर्शन दामिनी पथक, खालापूर पोलिस ठाणे यांच्या वतीने करण्यात आले. मार्गदर्शक म्हणून पोलिस कर्मचारी अश्विनी पापळ व मनिषा केंद्रे उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षितता, सायबर गुन्हे, तसेच गुड टच बॅड टच या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करत जागरूकता निर्माण केली. विद्यार्थ्यांच्या शंकांचे चर्चे द्वारे निरसन करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत एस.सी. अडसरे यांनी केले, तर प्रास्ताविक व्ही.जी. पाटील यांनी केले. आभारप्रदर्शन एस.यू. पवार यांनी केले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी दरेकर सर यांचे विशेष सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांना आयुष्यभर उपयोगी पडणारे सायबर सुरक्षिततेचे धडे या शिबिरातून मिळाल्याने उपस्थितांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.



# बाबुजी आव्हाड महाविद्यालयात अविष्कार स्पर्धेचे आयोजन

**पाथर्डी । नितीन गटाणी**

विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीस चालना मिळावी आणि त्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पनांना संशोधनात्मक व्यासपीठ मिळावे यासाठी मागील सहा वर्षांपासून बाबुजी आव्हाड महाविद्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली अविष्कार स्पर्धेचे आयोजन करत आहे. यावर्षी महाविद्यालयात महाविद्यलयीन स्तरावरील अविष्कार स्पर्धा पार पडली, ज्यात विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयावर एकूण दहा संशोधन प्रकल्प सादर केले. शितल बडे व भाग्यश्री गाडे यांनी फेज ऑफ मेनोपॉज अँड अवेअरनेस इन सोसायटी, तेजस्विनी बालवे व साक्षी पंडित यांनी कॅन्सर फ्री लाईफ, अण्णासाहेब देवढे व गणेश बोडखे यांनी ऑटोमेटेड डिपॉझिट अँड विड्रॉ स्लीप, पूनम डमाळे यांनी मूळव्याधीसाठी आयुर्वेदिक औषधाचा विकास, भाग्यश्री शेळके यांनी कोंडा निवारणासाठी प्रक्रियाधारित गोमूत्राचा उपयोग, शिवकन्या खेडकर व अंकिता चिकने यांनी किशोरवयीनांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा कुटुंबप्रकारनिहाय अभ्यास, अनुजा घाडगे व अक्षदा सानप यांनी एआय युगामध्ये समतोल वाचनासाठी साधनसंच, वैष्णवी नाकाडे व साक्षी उबाळे यांनी डिजिटल पेमेंटचा ग्राहकाच्या खरेदी वर्तनावर होणारा परिणाम, ओंकार शिरसाट यांनी मानसिक स्वास्थ्याबाबत विदुरनीती आणि आधुनिक मानसशास्त्रीय सिद्धांतांचा तुलनात्मक अभ्यास, तर सानिया शेख व अश्विनी शिरसाट यांनी डिजिटल टाइमटेबल जनरेटर या विषयावर आपापले संशोधन प्रकल्प सादर केले. प्रा. डॉ. सूर्यकांत काळोखे आणि प्रा. दत्तप्रसाद पालवे यांनी स्पर्धेचे परीक्षण करून विद्यार्थ्यांना मौलिक सूचना दिल्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून विभागीय स्तरावरील सादरीकरणासाठी शुभेच्छा दिल्या. सदर स्पर्धेचे प्रास्ताविक महाविद्यालयीन शैक्षणिक व संशोधन समन्वयक प्रा. डॉ. अभिमन्यू ढोरमारे यांनी केले, तर कार्यक्रमाचे आभार प्रा. शरद बोडखे यांनी व्यक्त केले. स्पर्धेत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

# ओला दुष्काळ जाहीर करा; शेतकऱ्यांना हेक्टरी ₹५० हजार द्या-आ. पवार

**जामखेड । रिजवान शेख**

राज्यात झालेल्या अतिवृष्टी, मुसळधार पाऊस आणि निसर्गाच्या प्रकोपामुळे कोरडवाहू, बागायती तसेच पिकलेली पिके मोठ्या प्रमाणावर वाहून गेली असून शेतकरी गंभीर अडचणीत आले आहेत. अनेकांचे संपूर्ण उत्पन्न उद्ध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांचे जीवन-मरणाचे संकट तीव्र झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तत्काळ ओला दुष्काळ घोषित करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टर किमान ५० हजार रुपयांची मदत द्यावी, अशी ठाम मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे. आ. पवार म्हणाले, नुकसानीची पाहणी सुरुय, पंचनामे सुरु आहेत, मदत देतोय, सकारात्मक आहोत अशी वेळकाढू भाषा आजतरी नको. सरकारच्या निकषानुसार हेक्टरी ८५०० म्हणजेच एकरी अवघी ३४०० रु. मदत देणार असेल तर ते शेतकऱ्यांची थट्टा आहे. महाराष्ट्रावर निसर्ग कोपला आणि सरकार शेतकऱ्याच्या हातात भोपळा देत असेल तर ते योग्य नाही. त्यांनी पुढे स्पष्ट केले, सध्याची परिस्थिती केवळ पंचनाम्यांवर किंवा तुटपुंजी मदतीवर निभावण्यासारखी नाही. निवडणुकीत दिलेली कर्जमाफीची आश्वासने पूर्ण करून तातडीने ठोस निर्णय घ्या, अन्यथा राज्यातील कृषी अर्थव्यवस्थेवर गंभीर संकट ओढवेल, असा इशाराही त्यांनी दिला. सध्या शेतकरी समाजावर ओढवलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातून ओला दुष्काळ जाहीर करण्याची आणि सरसकट हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत देण्याची मागणी तीव्र झाली आहे. सरकार या मागणीवर कोणता निर्णय घेते, याकडे शेतकऱ्यांसह संपूर्ण महाराष्ट्राचे डोळे लागले आहेत.

